**प्रसिध्दी पत्रक** दिनांक 14/06/2025

**आरोपी लोकसेवक**- 1) श्रीमती. कांचन नामदेवराव कांबळे, वय 34 वर्षे, व्यवसाय - नौकरी, पद- पुरवठा निरीक्षण अधिकारी (नायब तहसिलदार) तहसिल कार्यालय, गंगापुर, जि. छत्रपती संभाजीनगर राहणार- 701 रुबी इन सिगनी अपार्टमेंट, हमाल वाडा, छत्रपती संभाजीनगर ( वर्ग 2) यांनी तक्रारदार यांच्या आजोबाच्या नावे रास्त भाव दुकान क्रमांक 29 मौजे काटेपिंपळगाव ता.गंगापुर जि.छत्रपती संभाजीनगर यांच्या नावे वारसाने प्राधिकृत केलेले रास्त भाव दुकानाचे प्राधिकरपत्राचे निलंबन प्रस्ताव मागे घेण्यासाठी दिनांक 13/06/2025 रोजी 70,000/- (सत्तर हजार) रुपये लाचेची मागणी करुन तडजोड अंती 40,000 (चाळीस हजार) रुपये लाचेची मागणी करुन दिनांक 14/06/2025 रोजी 40,000/- (चाळीस हजार रुपये) स्विकारल्याने लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, छत्रपती संभाजीनगर यांच्या जाळ्यात.

| | | |
|---|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग | :- | छत्रपती संभाजीनगर |
| गुन्हा दाखल पोलीस ठाणे | :- | पोलीस ठाणे वेदांतनगर, छत्रपती संभाजीनगर शहर येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरु आहे. |
| आरोपी यांचे नाव व पत्ता | :- | 1) श्रीमती. कांचन नामदेवराव कांबळे, वय 34 वर्षे, व्यवसाय - नौकरी, पद- पुरवठा निरीक्षण अधिकारी (नायब तहसिलदार) तहसिल कार्यालय, गंगापुर, जि. छत्रपती संभाजीनगर राहणार- 701 रुबी इन सिगनी अपार्टमेंट, हमाल वाडा, छत्रपती संभाजीनगर ( वर्ग 2) |
| लाच मागणी रक्कम | :- | 70,000/- (सत्तर हजार) रुपये तडजोड अंती 40,000/- (चाळीस हजार) रुपये. |
| लाच स्विकृती रक्कम | | 40,000/- (अक्षरी :- चाळीस हजार रुपये ) |
| सापळा अधिकारी<br>सहाय्यक सापळा अधिकारी | :-<br>:- | श्री. वाल्मीक कोरे, पोलीस निरीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, छत्रपती संभाजीनगर<br>श्री. गोरखनाथ गांगुर्डे, पोलीस उप अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, छत्रपती संभाजीनगर |
| लाच मागण्याचा हेतु | :- | तक्रारदार यांच्या आजोबाच्या नावे रास्त भाव दुकान क्रमांक 29 मौजे काटेपिंपळगाव ता.गंगापुर जि.छत्रपती संभाजीनगर यांच्या नावे वारसाने प्राधिकृत केलेले रास्त भाव दुकानाचे प्राधिकरपत्राचे निलंबन प्रस्ताव मागे घेण्यासाठी आलोसे श्रीमती कांचन कांबळे, यांनी स्वत:साठी व जिल्हा पुरवठा अधिकारी यांच्यासाठी 70,000/- (सत्तर हजार) रुपयांची लाचेची मागणी केली असून तडजोड अंती स्वत: साठी 15,000/(पंधरा हजार रुपये) व जिल्हा पुरवठा अधिकारी यांच्यासाठी 25,000/- (पंचवीस हजार रुपय) असे एकुण 40,000/- (चाळीस हजार रुपये) लाचेची मागणी आलोसे यांनी तक्रारदार यांचेकडे केली. |
| थोडक्यात माहिती | | तक्रारदार यांच्या आजोबाच्या नावे रास्त भाव दुकार क्रमांक 29 मौजे काटेपिंपळगाव ता.गंगापुर, जिल्हा. छत्रपती संभाजीनगर यांच्या नावे वारसाने प्राधिकृत केलेले रास्त भाव दुकानाचे प्राधिकरपत्राचे निलंबन प्रस्ताव मागे घेण्यासाठी आलोसे श्रीमती. कांचन कांबळे यांनी स्वत:साठी व जिल्हा पुरवठा अधिकारी यांच्यासाठी 70,000/- (सत्तर हजार) रुपयांची लाचेची मागणी केली होती. तक्रारदार यांना आलोसे यांना लाच देण्याची इच्छा नसल्याने ते तक्रार देण्याकरीता लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, छत्रपती संभाजीनगर येथे हजर झाले असता त्यांची दिनांक 12/06/2025 रोजी तक्रार नोंद करण्यात आली.<br>तक्रारदार यांच्या तक्रारीनंतर दिनांक 13/06/2025 रोजी शासकीय पंचासह श्रीमती कांचन कांबळे, पुरवठा निरीक्षण अधिकारी गंगापुर यांची त्यांच्या कार्यालयात भेट घेऊन कामा संदर्भात चर्चा तक्रारदार यांनी केली. सदर चर्चेत आलोसे यांनी तडजोड अंती स्वत:साठी 15,000/- (पंधरा हजार) रुपये व जिल्हा पुरवठा अधिकारी यांच्यासाठी 25,000/- (पंचवीस हजार) रुपये असे एकुण 40,000/- (चाळीस हजार) रुपये लाचेची मागणी करुन लाचेची रक्कम दिनांक 14/06/2025 रोजी छत्रपती संभाजीनगर शहरात स्वीकारण्याचे कबूल केल्याचे निष्पन्न झाले होते.<br>त्याअनुषंगाने लाचमागणी पडताळणी अंती दिनांक 14/06/2025 रोजी वस्तू व सेवा कर भवनच्या गेटवर, रेल्वे स्टेशनच्या बाजुला छत्रपती संभाजीनगर या ठिकाणी शासकीय पंच यांचे समक्ष आलोसे श्रीमती कांचन कांबळे, पुरवठा निरीक्षण अधिकारी गंगापुर यांनी तक्रारदार यांचेकडून लाचेची |

| | | |
|---|---|---|
| | | 40,000 (चाळीस हजार) रुपये रक्कम स्विकारली असता त्यांना पंच समक्ष महिला पोलीस करवी ताब्यात घेण्यात आले असून पो.स्टे. वेदांतनगर, छत्रपती संभाजीनगर शहर येथे भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम 1988 चे कलम 7 , 7अ प्रमाणे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरु आहे. |

सदर कार्यवाही पोलीस अधीक्षक मा.श्री.संदिप आटोळे, अपर पोलीस अधीक्षक मा.श्री.मुकुंद आघाव, पोलीस उप अधीक्षक सुरेश ह. नाईकनवरे, यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक, श्री. वाल्मीक कोरे, यांनी केली आहे. त्यांना सदर कार्यवाही कामी पो.ह.राजेंद्र जोशी, पो.अं./डोंगरदिवे, सि.एन.बागुल, म.पो.ह.पुष्पा दराडे, अशा कुंटे यांनी मदत केली आहे.

लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे नागरिकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग यांचेशी संपर्क साधावा.


संपर्क पत्ता :- लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, औरंगाबाद

ई- मेल :- sp1acbaurangabad@gmail.com, 2) dyspacbabad@gmail.com

ऑनलाईन तक्रार ॲप्लीकेशन :- acbmaharashtra.net संपर्क क्रं. :- 0240-2344050, टोल फ्रि क्रं. 1064,

पोलीस अधीक्षक :- 9923023361 अपर पोलीस अधीक्षक :- 9881460103

पोलीस उप अधीक्षक :- 9923247986


पोलीस उप अधीक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,
छत्रपती संभाजीनगर.